# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 158/2022 दिनांक : 19.04.2022**

## 1)जबरी चोरी :—

**भाग्यनगर :—** दिनांक 17.04.2022 रोजी चे 08.30 वा. चे सुमारास, **चांदोजी पावडे मंगल कार्यालयाच्या समोर, नांदेड येथे,** यातील फिर्यादी हि तीचे स्कुटीवर घराकडे जात असताना पाठीमागून मोटार सायकलवर दोन अनोळखी इसमांनी येवून फिर्यादीचे गळयातील एक लहान व एक मोठे सोन्याचे जुने वापरते गंठन असा एकुण 2,10,524/—रूपयाचा ऐवज जबरीने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी शोभाबाई राजु केंद्रे, वय 39 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. कॅनल रोड, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 132/2022 कलम 392, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री जाधव, मो.क्रं. 9823603909** हे करीत आहेत.

## 2)मो. सा. चोरी :—

**मुदखेड :—** दिनांक 16.04.2022 रोजी चे 10.00 वा. ते दिनांक 17.04.2022 रोजीचे 07.30 वा. चे दरम्यान, **कृष्णानगर, मुदखेड ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो होंडा कंपणीची मो.सा. क्रं. एमएच—26/एझेड—1458 किमती 18,000/—रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी गंगाराम धारबा गुंठे, वय 30 वर्षे, व्यवसाय फोटोग्राफर रा. मराठा गल्ली मुदखेड ता. मुदखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरनं 94/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/1375 ठाकूर, मो.क्र. 7774051375** हे करीत आहेत.

## 3)पळवुन नेले :—

**विमानतळ :—** दिनांक 17.04.2022 रोजी चे 19.30 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरुन स्वातंत्र्य सैनिक कॉलनी, नांदेड येथे,** यातील फिर्यादीचा **मुलगा नामे आशुतोष संजय देशमुख वय 17 वर्ष रा. स्वातंत्र्य सैनिक कॉलनी, नांदेड** हा घरातुन मारोतीचे दर्शन घेवून येतो म्हणुन गेला तो आज पावेतो घरी परत आला नाही त्यास कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी पळवुन नेले आहे. वगैरे **फिर्यादी संजय देसाईराव देशमुख, वय 57 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. स्वातंत्र्य सैनिक कॉलनी, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 140/2022 कलम 363 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री देवके, मो.क्र. 9545688895** हे करीत आहेत.

## 4)भारतीय हत्यार कायदा :—

**विमानतळ :—** दिनांक 18.04.2022 रोजी 17.30 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरासमोर पांडुरंगनगर, नांदेड येथे,** यातील नमुद दोन मोटार सायकल चालक आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादी व त्याचा भाऊ यास रस्त्यावरील गजाळीची गाडी बाजुला घेण्याचे कारणावरुन वाद करुन शिवीगाळ करुन हातातील खंजरने फिर्यादी व त्याचे भावास डोक्यात मारुन दुखापत केली तसेच लाकडाने व लाथाबुक्याने मारुन जखमी केले. वगैरे **फिर्यादी गजानन दत्ता उटलवाड वय 35 वर्षे व्यवसाय मिस्त्रीकाम रा. पांडुरंगनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 142/2022 कलम 4/25 भाहका सह कलम 324,323,504,34 प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/1334 जाधव, मो.नं. 8805859640** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# प्रेसनोट

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 159/2022 दिनांक : 19.04.2022

सध्या शरामध्ये सोशल मिडीयावर नकली हत्यारे, पिस्टल, खंजर, तलवार, हत्यारासह फोटो काढुन सोशल मिडीयावर व्हायरल करण्याचे प्रकार वाढल्याने **मा. श्री प्रमोद शेवाळे,** पोलीस अधिक्षक, नांदेड यांनी असे प्रकारचे गुन्हे करणारे गुन्हेगारांचा शोध घेवून कायदेशीर कार्यवाही करण्याचे व त्यास प्रतिबंध करण्याचे आदेशीत केले.

### पोस्टे विमानतळ

पोलीस निरीक्षक श्री अनिरुध्द काकडे, सपोनि गिरी व त्यांचे विशेष पथकाने आरोपी नामे 1) प्रमानंद राजु नरवाडे वय 20 वर्षे रा. इचलकरंजी जि. सोलापुर ह.मु. आशिर्वादनगर नांदेड 2) विशाल अनंतराव कांबळे वय 18 वर्षे रा. शिवनगर, नांदेड 3) रितेश दिपक पंडीत वय 18 वर्षे रा. सिध्दार्थ नगर तरोडा बु. नांदेड व 3 अल्पवयीन विधी संघर्ष बालक यांना ताब्यात घेवून त्यांचे कडुन तिन नकली पिस्टल जप्त करुन कायदेशीर कार्यवाही करण्यात आली. पोस्टे विमानतळ गु.र.नं. 143/2022 कलम 6/25 भाहका सह कलम 34 भादवी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच अल्पवयीन विधी संघर्ष बालकावर नियमानुसार कार्यवाही करुन सोडण्यात आले. सदर कार्यवाहीत सपोनि श्री गिते, पोह दारासिंह राठोड, पोना कलंदर यांनी भाग घेतला.

### पोस्टे शिवाजीनगर

**मा. श्री निलेश मोरे,** अपर पोलीस अधिक्षक, नांदेड, पोनि श्री नितीन काशीकर, सपोनि रवि वाव्हुळे, डी.बी. पथक, आर.सी.पी. अंमलदार यांच्यासह पोलीस स्टेशन शिवाजीनगर हद्दीमध्ये नानानानी पार्क, नवामोंढा परीसर, वसंतनगर, खोब्रागडे नगर, इत्यादी भागामध्ये विनाकारण रस्त्यावर फिरणारे गोंधळ घालणारे **अकरा** टारगट लोकांनवर कार्यवाही करुन **कलम 110/117 मपोका** प्रमाणे कार्यवाही करण्यात आली.

तसेच विशेष मोहिम राबवून रेकॉर्डवरील सहा आरोपी चेक करण्यात आले, नाकाबंदी दरम्यान 69 वाहन चेक करुन 26 वाहनावर मोवाका प्रमाणे कार्यवाही करण्यात आली 3 वाहन डिटेन करुन पोस्टेला लावण्यात आले, हद्दीतील ढाबे चेक करण्यात आले.

नांदेड पोलीस दलातर्फे जनतेला आवाहन करण्यात येते की, लोकांनी विनाकारण अवेळी, रात्री बेरात्री रस्त्यावर फिरुनये, बेशिस्त वाहन रस्त्यावर लावूनये रस्त्याने चालताना लोकांनी मोवाका चे तंतोतंत पालन करावे पालन न केल्यास कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल तसेच हत्यारासह, नकली हत्यारासह फोटो, व्हिडोओ किंवा मजकुर सोशल मिडीयावर प्रसारीत केल्यास सायबर शाखा व नांदेड पोलीस दलातर्फे लक्ष ठेवून कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

सदरची कार्यवाही **मा. श्री प्रमोद शेवाळे,** पोलीस अधिक्षक नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली **मा. श्री निलेश मोरे**, अपर पोलीस अधिक्षक, नांदेड, पोनि अनिरुध्द काकडे, पोस्टे विमानतळ, पोनि नितीन काशीकर, पोस्टे शिवाजीनगर, व त्यांचे विशेष पथक यांनी केली.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड